दि.६ एप्रिल, २०१८ रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज संस्थांच्या सार्वत्रिक/ पोटनिवडणुकासाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक मतदान २०१८/प्र.क्र.३५/कामगार-९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ३१ मार्च, २०१८

<u>संदर्भ</u> :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/नपा-२०१८/प्र.क्र.०७/का.६, दि. २२ मार्च,२०१८ चे पत्र.

शासन परिपत्रक

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती) मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणामध्ये घेण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे व त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेले आदेश सर्वांवर बंधनकारक आहे.

२. आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व लोकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये १०० टक्के मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/ आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते. जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि. ६ एप्रिल,२०१८ रोजी सोबतच्या परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सार्वत्रिक/ पोट निवडणुका घेतल्या जाणार आहेत. या निवडणुकांमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग,ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने,दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा.खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाटयगृहे, व्यापार,औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या क्रमांक राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/नपा-२०१८/प्र.क्र.०७/का.६, दि-२२ मार्च,२०१८ च्या पत्रास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११२००३७५५१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.03.31 12:01:07 +05'30'

(श.मा. साठे)

शासनाचे उप सचिव

प्रत - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. कामगार आयुक्त, बांद्रा, मुंबई-५१
४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, बांद्रा, मुंबई
५. संचालक, बाष्पके, बांद्रा, मुंबई,
६. आयुक्त,सांगली, नाशिक, मुंबई, सिंधुदूर्ग, पुणे, कोल्हापूर,सोलापूर,धुळे, औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मानाबाद, यवतमाळ, ठाणे, रत्नागिरी, जळगाव, अहमदनगर, धुळे, वर्धा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली महाराष्ट्र राज्य.
७. जिल्हाधिकारी, सांगली, नाशिक, मुंबई, सिंधुदूर्ग, पुणे, कोल्हापूर,सोलापूर,धुळे, औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मानाबाद, यवतमाळ, ठाणे, रत्नागिरी, जळगाव, अहमदनगर, धुळे, वर्धा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली महाराष्ट्र राज्य.
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
९. कामगार विभागातील सर्व कार्यासने

प्रत माहितीसाठी :

१ मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

२ मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

३ मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

परिशिष्ट-१

दि-०६.०४.२०१८ रोजी होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांचा पोटनिवडणुकांचा तपशील

अ.क्र.	जिल्हा	पोट निवडणूक असलेल्या निवडणुकीचा प्रभाग व जागा क्रमांक
१.	नाशिक	नाशिक मनपा प्रभाग क्र.१३-क
२.	सोलापूर	सोलापूर मनपा प्रभाग क्र.१४-क
३.	जळगाव	जळगाव मनपा प्रभाग क्र.२६-ब
४.	पुणे	पुणे मनपा प्रभाग क्र.२२-क
५.	मुंबई	बृहन्मुंबई मनपा प्रभाग क्र.१७३
६.	अहमदनगर	अहमदनगर मनपा प्रभाग क्र.३२ ब
७.	ठाणे	उल्हासनगर मनपा प्रभाग क्र.१७-ब
	जिल्हा परिषदा	
१.	धुळे	जि.प.धुळे, २२- चिमठाणे निवडणूक विभाग
२.	वर्धा	जि.प.वर्धा, १९- हमदापूर निवडणूक विभाग
३.	उस्मानाबाद	जि.प.उस्मानाबाद, ३०- आनाळा निवडणूक विभाग
	पंचायत समित्या	
१.	सिंधुदुर्ग	पं.स.कुडाळ, ६१-पिंगुळी निर्वाचक गण
२.	धुळे	पं.स.धळे, ८७- नगाव निर्वाचक गण
३.	धुळे	पं.स.साक्री, ७१-साक्री निर्वाचक गण
४.	औरंगाबाद	पं.स.गंगापूर, ७७-तुर्काबाद निर्वाचक गण
५.	औरंगाबद	पं.स.वैजापूर, ६०-संवदगाव निर्वाचक गण
६.	नांदेड	पं.स.बिलोली, ६६-सगरोळी निर्वाचक गण
७.	नांदेड	पं.स.लोहा, ८३-मारतळा निर्वाचक गण
८.	उस्मानाबाद	पं.स.तुळजापूर, ७७- काटी निर्वाचक गण
९.	गोंदीया	पं.स.सडक-अर्जुनी, ७८-सौंदड निर्वाचक गण
१०.	वर्धा	पं.स.हिंगणघाट, ९२-आजंती निर्वाचक गण
११.	चंद्रपूर	पं.स.चंद्रपूर, ६४-घुग्घुस-२ निर्वाचक गण
१२.	गडचिरोली	पं.स.आरमोरी, २२-मानापूर निर्वाचक गण

परिशिष्ट-२

दि-०६.०४.२०१८ रोजी होणाऱ्या नगरपरिषदा/ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांचा तपशील

अ.क्र.	जिल्हा	सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगरपरिषद/ नगरपंचायती नाव	पोट निवडणूक असलेल्या निवडणुकीचा प्रभाग व जागा क्रमांक
१.	सिंधुदूर्ग	कणकवली नगरपंचायत	--
२.	रत्नागिरी	गुहागर नगरपंचायत	--
३.	रत्नागिरी	देवरुख नगरपंचायत	--
४.	रत्नागिरी	--	रत्नागिरी नगरपरिषद प्रभाग क्र.३ ब
५.	पुणे	--	आळंदी नगरपरिषद प्रभाग क्र.१ अ
६.	सांगली	--	तासगाव नगरपरिषद प्रभाग क्र.६ अ
७.	सोलापूर	--	दुधनी नगरपरिषद प्रभाग क्र.४ ब
८.	कोल्हापूर	आजरा नगरपंचायत	--
९.	जळगाव	जामनेर नगरपरिषद	--
१०	जळगाव	--	पाचोरा नगरपरिषद प्रभाग क्र.६ ब
११.	जळगाव	--	सावदा नगरपरिषद प्रभाग क्र.३-ब
१२.	ओरंगाबाद	वैजापूर नगरपरिषद	--
१३.	नांदेड	--	कुंडलवाडी नगरपरिषद प्रभाग क्र.५ ब
१४.	यवतमाळ	--	कंळब नगरपंचायत प्रभाग क्र.४